# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०

http://www.dteau.orgEmail-roaurangabad.dte@gmail.com


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/4445

दिनांक :- 28 NOV 2017

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय अनुदिनित पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी

अभियांत्रिकी/औषधनिमार्णशास्त्र/एम.बी.ए/एम.सी.ए/

एच.एम.सी.टी/वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था

**औरंगाबाद विभाग**

**विषय :- महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी/विद्यार्थीनीच्या सुरक्षेबाबत उपयायोजना करणे संदर्भात.**

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१६/आस्था/संकीर्ण/२०१७/शा २६०७ दिनांक १०/११/२०१७

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये संस्थेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकरिता पुरेशा उपाययोजना करण्यासाठी योग्य ते निर्देश संबंधित संस्थांना देण्याबाबत मा.राज्यमंत्री,गृहनिर्माण, उच्च व तंत्र शिक्षण यांनी मा. अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांना लिहलेल्या पत्राची प्रत संचालनालयाकडून या कार्यालयास संदर्भिय पत्रान्वये प्राप्त झालेली आहे.

या पत्रान्वये या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी /एम.बी.ए./एम.सी.ए. व वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या शासन पत्रानुसार व मा.राज्यमंत्री, गृहनिर्माण, उच्च व तंत्रशिक्षण यांच्या पत्रात नमुद केल्या नुसार कार्यवाही करण्यात येवून त्या बाबतचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

सोबत :- वरील प्रमाणे.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

सोबत उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे "**महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी – विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करणे संदर्भात**" या विषयाचे पत्र क्रमांक : संकिर्ण-1111/प्र.क्र. 79/17/समन्वय, दिनांक : 23.10.2017 ची प्रत सोबत जोडली आहे.

----*----*----*----

**क्रमांक**:10/एनजीपी/संकीर्ण/2017/शा 2607
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. 1967,
मुंबई-400001.

दिनांक : 21 NOV 2017

**प्रति,**

1. **सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे,**
2. **संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई,**
**यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यता प्राप्त सर्व संस्था प्रमुखांना सदर परिपत्रक निदर्शनास आणावे व परिपत्राच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत कळवावे.**

(डॉ. सुभाष महाजन)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :

1. कार्यासन क्रमांक : 2, 2अ, मुख्य कार्यालय, मुंबई, यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.
2. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक 3, आयटीसेल, मुख्य कार्यालय, मुंबई यांना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

क्र. संकिर्ण-१११९ /प्र.क्र.७१/१७ /समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई – 400 032.
दिनांक :- २३ऑक्टोबर, २०१७

प्रति,

१ ) विभागातील सह सचिव ( विद्यापीठ शिक्षण ) उप सचिव ( महाविद्यालयीन शिक्षण/तंत्र शिक्षण. /कला / ग्रंथालये) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२

२) संचालक (~~उच्च शिक्षण~~ / तंत्र शिक्षण /~~कला~~ / ~~ग्रंथालय~~) महाराष्ट्र राज्य.

विषय :- महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करणे संदर्भात.

मा.श्री.रविंद्र वायकर, राज्यमंत्री, गृहनिर्माण व उच्च व तंत्र शिक्षण यांचे दि.१९.९.२०१७ चे पत्र सोबत पाठविण्यात येत आहे.

२. सदर प्रकरणी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर होणा-या रॅगिंग, दहशत, लैंगीक शोषण, प्रसंगी खुन इ. गंभीर घटनांमध्ये वाढ झाल्याचे वर्तमानपत्र अथवा इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या बातम्यांतून कळते. विद्यापीठ व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची सुरक्षा ही संबंधित शैक्षणिक संस्थेची असल्याने शैक्षणिक संस्थांचा, शैक्षणिक परिसर व वसतिगृहे, ग्रंथालय, उपहारगृहे इत्यादी मध्ये सुरक्षेच्या पुरेशा उपाययोजना करण्यासाठी शैक्षणिक परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे, सर्व विद्यार्थ्यांना ओळखपत्र लावून महाविद्यालयात प्रवेश बंधनकारक करणे, योग्य ठिकाणी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करणे इत्यादि बाबींचा अवलंब करणेबाबत मा.राज्यमंत्री महोदयांनी वरील दि.१९.९.२०१७ च्या पत्रान्वये मा.राज्यमंत्री, (गृहनिर्माण व उच्च व तंत्र शिक्षण) यांनी आदेशीत केले आहे. तरी सदर प्रकरणी कार्यवाही होण्यासाठी आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधीतांना कळविण्यात यावे व त्याचा अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यात यावा, अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

( रा.वि.जाधव )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

शा. २६०७
२७/१०/२०१७

विभाग क्र. रवी/गृनि.,उ.व तंशि./ ३९५ /२०१७

राज्यमंत्री

गृहनिर्माण, उच्च व तंत्र शिक्षण

महाराष्ट्र शासन

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

www.maharashtra.gov.in

ई-मेल : stateminister.housing@gmail.com

**रविंद्र दत्ताराम वायकर**

पालकमंत्री - रत्नागिरी जिल्हा

अ.क्र. रामं ६०१७/समन्वय ११/१०/१७

अ.मु.स. उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय क्र. ८४९-७१९ दि. 26-9-17

दिनांक : १९ सप्टेंबर,२०१७

विषय : महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करणे संदर्भात... .. ..

राज्यात दिवसेंदिवस विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणाकडे कल वाढत असून, विद्यार्थी मोठया संख्येने राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रमांना विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित होत आहेत. नवनविन अभ्यासक्रमांच्या मागण्यांमुळे नविन अभ्यासक्रमांच्या अतिरिक्त तुकडया अथवा नविन महाविद्यालयांची संख्या देखील झपाटयाने वाढत आहे.

अलीकडे महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षे संदर्भात वर्तमानपत्रातून अथवा इलेक्ट्रॉनिक मिडीयातून विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या रॅगिंग, दहशत, लैंगीक शोषण, प्रसंगी खुन इ. गंभीर घटनांमध्ये वाढ झाल्याचे बातम्यांतून कळते. यामुळे विविध विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न देखिल ऐरणीवर आला आहे. विद्यापीठे व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची सुरक्षा ही संबधित शैक्षणिक संस्थेच्या प्रशासनाची आहे परंतु कांही शैक्षणिक संस्थांच्या शैक्षणिक परिसर व वसतिगृहे,ग्रंथालय,उपहारगृह इ.मध्ये सुरक्षेच्या पुरेशा उपाययोजना केल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे दिवसेंदिवस वरिल घटनांमध्ये वाढ होत आहे. त्याकरिता सर्व संबधित विद्यापीठे व महाविद्यालयांनी विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना म्हणून संपुर्ण शैक्षणिक परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे,सर्व विद्यार्थ्यांना ओळखपत्र लावून महाविद्यालयात प्रवेश बंधनकारक करणे, योग्य ठिकाणी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करणे इत्यादि बाबींचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे.

शैक्षणिक संस्थांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत संवेदनशील असून त्यास गांभीर्याने घेणे गरजेचे असल्याने राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत पुरेशा व योग्य उपाययोजना करण्याबाबत कळवून त्याचा अनुपालन अहवाल एक महिन्यात शासनास सादर करण्याबाबत सुचना आपल्यास्तरावरुन निर्गमित कराव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सत्वर मला अवलोकनार्थ सादर करावा.

DS/B
JS/K
समन्वय

(रविंद्र दत्ताराम वायकर)

प्रति,

अवर मुख्य सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२